# भारतीय साहित्य आणि मराठी : एक समृद्ध परंपरा

**चंद्रकांत वाघमारे**

मराठी विभाग, राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगावी.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.18333000

**ABSTRACT:**

भारत हा बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक देश असूनही, येथील साहित्यातून भारतीयत्वाची एकसमान सूत्रे आणि 'वसुधैव कुटुंबकम' हे तत्त्वज्ञान प्रतीत होते. प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय साहित्याच्या व्यापक परंपरेचा आणि त्यातील मराठी साहित्याच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा आढावा घेण्यात आला आहे. प्राचीन संस्कृत, पाली आणि द्रविड साहित्यापासून ते मध्ययुगीन भक्ती चळवळ आणि आधुनिक प्रबोधनकाळापर्यंतचा भारतीय साहित्याचा प्रवास यात मांडला आहे. विशेषतः संत साहित्य, आधुनिक कथा-कादंबरी आणि दलित साहित्याच्या माध्यमातून मराठी भाषेने भारतीय साहित्याला दिलेल्या समृद्धीची चर्चा यात केली आहे. भाषिक विविधता असूनही भारतीय संस्कृती आणि साहित्यातील अंतर्निहित एकात्मता या लेखातून स्पष्ट होते.

**KEYWORDS:**

भारतीय साहित्य, मराठी साहित्य, बहुभाषिकता, सांस्कृतिक एकात्मता, साहित्यिक परंपरा.

भारत हा असा देश आहे जिथे शेकडो भाषा बोलल्या जातात आणि प्रत्येक भाषेचा स्वतःचा असा एक साहित्यिक इतिहास आहे. एका सर्वेक्षणानुसार, भारतात अंदाजे १६५२ भाषा बोलल्या जातात. त्यापैकी २२ भाषा संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध आहेत. यामध्ये हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली, ओडिया सारख्या प्रमुख आधुनिक भारतीय भाषा आणि कन्नड, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम सारख्या दक्षिण भारतीय भाषांचा समावेश आहे, ज्यांचा साहित्यिक इतिहास मोठा आहे. त्यामध्ये बोडो आणि संथाली सारख्या भाषांचा देखील समावेश आहे, ज्यांना फक्त चार वर्षांपूर्वी संविधानात राष्ट्रीय भाषा म्हणून मान्यता देण्यात आली होती. डोंगरी आणि कोकणी सारख्या भाषा देखील आठव्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध आहेत, परंतु त्यांचे बोलणारे तुलनेने कमी आहेत. याव्यतिरिक्त, मौखिक साहित्य असलेल्या असंख्य लोक आणि आदिवासी भाषा आहेत. यापैकी अनेक भाषा आधुनिक साहित्यिक प्रकारांमध्ये लिहिल्या जात आहेत आणि मासिके देखील प्रकाशित होत आहेत.

भारतीय साहित्य येथील बहुरंगी, बहुआयामी भाषांच्या जोरावर भारतीय मानसिकतेच्या विशाल आणि जटील अशा विविधतेचे एक अद्वितीय उदाहरण आहे. भारत हा नेहमीच एक बहुभाषिक देश राहिला आहे. भारत हा देश त्याच्या विविध ओळखीसह ज्यामध्ये हजारो भाषा, त्याच्या बोली आणि उपबोली व एकच तत्वज्ञान, असंख्य श्रद्धा, परंपरा, प्रथा, रितीरिवाज, वैविध्यपूर्ण जीवनशैली, आचार-विचार, विविध प्रकारचे अन्नपदार्थ, खाण्याची पद्धती, विविध सवयी, अलंकार, सौंदर्यप्रसाधने, विविध प्रकारचे रंगीबेरंगी कपडे आणि त्यावरील नक्षीकाम, विविध प्रकारचे व्यवसाय आणि त्यातील कौशल्य यांचा समावेश होतो. भारतीय जीवनशैली आणि विचारधारेची व्याख्या 'वसुधैव कुटुंबकम' अशी फार वर्षांपासून करण्यात आलेली आहे. आजचे जग 'वसुधैव कुटुंबकम' या भारतीय तत्त्वज्ञानाला अनुसरून सर्व जगाला 'जागतिक गाव' (ग्लोबल व्हिलेज) म्हणून ओळखत आहे. शिवाय भारतीय तत्त्वज्ञान नेहमीच उदारमतवादी राहिले आहे. भारतीय विचारसरणी ही व्यक्तीवादी नाही तर संपूर्ण मानवतेसाठी समर्पित केली गेली आहे, आणि म्हणूनच भारतीय साहित्य हे रूप, ध्वनी आणि लय यामध्ये वैयक्तिक आणि स्वतंत्र विशेष असूनही ते एकतेचे उल्लेखनीय असे जागतिक पातळीवरील उदाहरण आहे. असे भारतीय साहित्य भारतीयांची सर्वांगीण ओळख घडवून आणते. येथील बहुविध संस्कृतीचा सुंदर आलेख या भारतीय साहित्यातून काढला गेलेला आहे.

भारत हा बहुभाषिक देश आहे. शिवाय येथे बहुसंस्कृतीही वसलेली आहे. येथे त्याच्या अनेक भाषा बोलणाऱ्यांची संख्या जगातील अनेक राष्ट्रांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. हिंदी वगळता, भारतातील असंख्य प्रादेशिक भाषा बोलणाऱ्यांची संख्या युरोपियन आणि आफ्रिकन देशांच्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. असे बहुभाषिक आणि बहुसंस्कृतीने नटलेल्या देशात मात्र एकता दिसून येते. येथे अनेक भाषा आणि संस्कृती यांचा सुंदर मिलाफ झालेला दिसून येतो. भाषा आणि साहित्याने या अखंड देशाला जोडले गेलेले आहे. येथील अनेक प्रमाणभाषा आणि बोलीतून विपुल प्रमाणात आणि वैविध्यपूर्ण अशी साहित्यरचना झालेली आहे. भारत हा अनेक भाषांचा विशाल असा देश आहे; असे म्हणत असताना उत्तर पश्चिम भागात पंजाबी, हरियाणी, हिंदी, उर्दू, पूर्वेला असामी, अरुणाचली, नागा, मिझो, मणिपुरी, बंगाली, ओडिया, पश्चिमेला गुजराती, राजस्थानी, मराठी भाषा, दक्षिणेला कन्नड, तेलुगू, तमिळ, मल्याळम भाषा तर काश्मिरी, कोकणी, सिंधी, डोंगरी, भोजपुरी आणि संस्कृत या भाषांनी आपली प्राचीनता टिकवून नावीन्य निर्माण केले आहे. या सर्व भाषांतून कमी अधिक प्रमाणात साहित्य रचना झालेली दिसून येते. त्या त्या भाषेतील साहित्यातून तेथील संस्कृती, रीतीरिवाज, लोकांच्या समजुती, देव-देवता, श्रद्धा, पेहराव, अन्नपदार्थ, परंपरा, उत्सव, सणवार आदींचे दर्शन घडते. शिवाय या भाषा साहित्याने समृद्ध झालेल्या आहेत. या भारतीय भाषांवर संस्कृत भाषा आणि पाली भाषांचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसतो. आज संस्कृत भाषा ही बोलीभाषा अथवा साहित्यिक भाषा राहिलेली नाही. बोलीभाषा म्हणून तिची भूमिका फार वर्षांपूर्वी संपलेली असली तरी आजही पूजाविधी, विविध प्रकारचे विधी, भक्ती, कर्मकांड, संस्कार आदी शुभ समारंभांमध्ये अजूनही आपले स्थान तिने निश्चित केले आहे. हिंदी, मराठी, कन्नड, बंगाली आदी सर्व भारतीय भाषांच्या शब्दसंग्रहामध्ये संस्कृत शब्दांचा मोठा भरणा आहे. शिवाय स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत 'जन गण मन' आणि राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' या दोन्हीमध्ये संस्कृत शब्दसंग्रह मोठ्या प्रमाणात आढळतो.

भारतीय साहित्य हे राष्ट्रीय साहित्यात मोडते आणि म्हणून राष्ट्र, राष्ट्रीयता, राष्ट्रीय मनोधर्म इत्यादी संबंधीची एक चौकट स्वीकारून तिच्या परिघात भारतीय साहित्याचा विचार करावा लागतो. भारतीय साहित्याला इंग्रजीमध्ये 'इंडियन लिटरेचर' असे संबोधले जाते. भारतीय साहित्य म्हणजे भारताचे राष्ट्रीय साहित्य होय. राष्ट्रीय साहित्य म्हणजे काय? हे सांगताना एके ठिकाणी मराठीतील प्रसिद्ध साहित्यिक-समीक्षक

प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, “भारतीय साहित्य म्हणजे भारताचे राष्ट्रीय साहित्य. एखाद्या राष्ट्रातील लेखक-कवींनी आपल्या राष्ट्रभाषेत लिहिलेले साहित्य म्हणजे राष्ट्रीय साहित्य होय. सामान्यतः राष्ट्रीय साहित्यात तेथील बोलीभाषेत असणारे मौखिक परंपरेतील लोकसाहित्य व तेथील प्रमाणभाषेत लिहिले जाणारे लिखित परंपरेतील साहित्य या दोन्ही धारांचा समावेश होतो. राष्ट्रीय साहित्यात राष्ट्रविशिष्ट असे काही स्थूल व ठळक स्वरूपाचे गुणधर्म असतात आणि त्या त्या राष्ट्रीय समाजाचा इतिहास, भूगोल, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थितिगती, भाषावैशिष्ट्ये यांसारख्या घटकांनी मिळून जी समग्र अवस्था अस्तित्वात असते, त्या समग्र अवस्थेशी या गुणधर्माचा संबंध असतो. या राष्ट्रीय समग्र अवस्थेला आपण स्थितिगतिशील असा राष्ट्रीय सांस्कृतिक व्यूह म्हणू. राष्ट्रीय संस्कृतीविशिष्टता किंवा संस्कृतीसापेक्षता हे राष्ट्रीय साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण ठरते.”

भारतीय साहित्य प्रादेशिक भाषा बोलणाऱ्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण करते. या भावनेला न जुमानता, भारतीय साहित्यातून एक अंतर्निहित प्रवाह वाहतो जो हे सिद्ध करतो की, भाषिक भिन्नता असूनही, भारतीय संस्कृती एकसंध आहे. भारतीय साहित्याचा विचार करण्याची प्रेरणा तौलनिक साहित्याभ्यासातून मिळालेली दिसून येते. दोन भिन्न भाषांतील साहित्यकृती, साहित्यिक, साहित्यिक परंपरा, विचारधारा याच्या साम्य-भेदाचा तौलनिक साहित्याभ्यास यामध्ये केला जातो. भारतीय साहित्य हे नेहमीच त्याच्या प्रादेशिक आणि भाषिक सीमा ओलांडत आले आहे.

भारतातील आर्यपूर्व लोकांनीही त्यांच्या समकालीन साहित्यापेक्षा श्रेष्ठ आणि समृद्ध अशा साहित्याची निर्मिती केलेली आहे. इंडो-आर्यन आणि द्रविड कुळातील लोक भारतीय साहित्याची निर्मिती प्राचीन काळापासून करत आलेले आहेत. ज्यांना आपण द्रविड कुळातील मानतो त्यांनीही भारतीय साहित्याची एक समृद्ध परंपरा निर्माण केलेली आहे. द्रविड कुळातील प्रमुख भाषा म्हणून तमिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम या होत. भारतीय साहित्याच्या निर्मितीला या द्रविड कुळातील भाषांनीही योगदान दिले आहे. आर्यकालीन आणि द्रविडकालीन भाषा गटातील लोकांनी साहित्याची निर्मिती करून भारतीय साहित्याची एक समृद्ध परंपरा निर्माण केली आहे. शिवाय या दोन्ही कुळातील साहित्याने व्यापक परस्पर प्रभावही टाकला आहे.

भारतीय साहित्याच्या एकतेमध्ये संस्कृत साहित्याचे योगदान

नाकारता येणार नाही. प्राचीन काळातील वैदिक आणि नंतरच्या संस्कृत साहित्याने भारतीय साहित्याला सातत्याने प्रेरणा दिली आहे. त्याची परंपरा आजही अखंड चालू आहे. 'रामायण', 'महाभारत', 'वेद उपनिषद', 'भगवद्गीता', 'पुराण' आदींनी भारतीय भाषांना समृद्ध कथात्मक साहित्याची प्रेरणा दिली आहे. तर कालिदास, बाण, भवभूती, हर्ष आदींनी मध्ययुगीन काव्याच्या कला आणि शैलीवर खोलवर प्रभाव टाकला आहे. अनेक भारतीय लेखक-कवींवर महाकाव्याचा खोलवर परिणाम झालेला दिसून येतो. तसेच तुळशीदास, कबीरदास, माधव कंदली, पंप आदी विविध भाषेतील साहित्यिकांनी केलेल्या रचनेमध्ये एकरूपता दिसून येते. परंतु अनेक बाबतीत यामध्ये वैविध्यताही दिसून येते. यामुळे भारतीय साहित्यामध्ये एकरूपता आणि विविधता आढळते. तसेच पाली, प्राकृत आणि अपभ्रंश भाषेतील साहित्याने आधुनिक भारतीय भाषेतील साहित्याला प्रेरणा दिली आहे. कथानक, शैली, निवेदने इत्यादी बाबतीत मध्ययुगीन भारतीय साहित्यावर अपभ्रंश भाषेतील कथा काव्याचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे, आणि भाषेतून रचले गेलेले, लिहिले गेलेले साहित्य ही एक सांस्कृतिक घटना आहे. शब्द या माध्यमाच्या द्वारे साहित्य आकाराला येते आणि या रचनेमुळे त्या त्या काळातील अनुभवांचा एक सांस्कृतिक दस्तऐवज बनतो. त्या संस्कृतीचे विशेष आणि त्या संस्कृतीतील विविधता यांचा कलात्मक आविष्कार साहित्यातून होतो. मग साहित्यामुळे त्या त्या संस्कृतीला एक अक्षरत्व प्राप्त होते. कारण ते ते साहित्य त्या त्या काळाचे अपत्य असते. असे साहित्य आणि त्यांचा काळ हे परंपरेचे द्योतक बनते. भारतीय साहित्य हे भारतीयांची आणि भारतीय संस्कृतीची ओळख करून देते. अशा भारतीय साहित्याला अत्यंत प्राचीन अशी एक समृद्ध परंपरा लाभलेली आहे.

भारतीय साहित्याचा एक प्रमुख विशेष म्हणजे येथील भाषिक विविधता होय. भारतात शेकडो भाषा बोलल्या जातात आणि यापैकी अनेक भाषांमध्ये त्यांची साहित्यिक समृद्ध परंपरा निर्माण झालेली आहे. या प्रमुख भाषांमध्ये संस्कृत, हिंदी, मराठी, कन्नड, तमिळ, तेलुगू, बंगाली, उर्दू, गुजराती, राजस्थानी, मल्याळम, पंजाबी, ओडिया, असामी, काश्मिरी आदी भाषा येतात. भारतामध्ये प्रामुख्याने दोन प्रमुख भाषिक गट दिसून येतात: १. इंडो-युरोपियन (यामध्ये इंडो-आर्यन शाखेतील भाषा अंदाजे ७४% लोक बोलतात) २. द्रविड भाषा गट

(यामध्ये अंदाजे २४% लोक या गटातील भाषा बोलतात). याशिवाय भारतामध्ये ऑस्ट्रो-एशियाटिक आणि तिबेटो-बर्मन या भाषाही स्वतंत्र भाषा म्हणून बोलल्या जातात. अंदमान-निकोबार बेटावर बोलली जाणारी 'अंदमानी' ही भाषा कोणत्याही भाषिक गटाशी संबंधित नाही, असे भाषा अभ्यासकांचे मत आहे. भारतामध्ये संविधानानुसार सध्या बोलल्या जाणाऱ्या २२ प्रादेशिक भाषांना शासकीय राजभाषेचा दर्जा दिला गेलेला आहे. त्यामध्ये असामी, कन्नड, मराठी, उर्दू, ओडिया, काश्मिरी, कोंकणी, तमिळ, तेलुगू, गुजराती, नेपाळी, पंजाबी, डोंगरी, बंगाली, बोडो, मल्याळम, मैतेई, संथाली, संस्कृत, मैथिली, सिंधी, हिंदी या भाषांचा समावेश केला गेलेला आहे. यातील भारत सरकारने तमिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्याळम, ओडिया, मराठी, पाली, प्राकृत, असामी व बंगाली या ११ भाषांना अभिजात भाषांचा दर्जा दिलेला आहे. या अभिजात भाषांमध्ये अत्यंत समृद्ध अशी साहित्याची परंपरा असलेली दिसून येते. या भाषांना पंधराशे ते दोन हजार वर्षाची साहित्याची परंपरा आहे.

संस्कृत भाषा म्हणजे भारतीय साहित्याचा 'साहित्य खजिना' आहे. यामध्ये वेद, उपनिषद, रामायण, महाभारत, पुराणग्रंथ, भगवद्गीता आदी साहित्य आणि त्या काव्यातील धार्मिक रचना ही संस्कृत साहित्याचा अविभाज्य भाग आहे. संस्कृतनंतर इतर भाषेतील साहित्याचा विकास झाला आहे. तमिळ, मराठी, कन्नड, हिंदी, तेलुगू, बंगाली, उर्दू आदी भाषेतील साहित्याचा विकास झाला. या सर्व भाषेतील साहित्याची रचना आणि शैलीलेखन यामध्ये एकता असूनही विविधता आहे.

भारतीय साहित्यातील सर्वात प्राचीन वाङ्मय प्रकार काव्याचा आहे. वेद, उपनिषद, रामायण, महाभारत आदींची रचना कालस्वरूपातील आहे. काव्यानंतर गद्य साहित्याचा विकास झालेला आहे. यामध्ये कथा, कादंबरी, ललितसाहित्य, निबंधलेखन, चरित्र, आत्मचरित्र, नाटक आदी गद्यस्वरूपात साहित्यरचना झाली. याबरोबरच काव्य आणि गद्य यांचा मिलाफ नाटक स्वरूपात झालेला आहे. भारतीय साहित्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे धार्मिक आणि तत्त्वनिष्ठ रचना होय. वेद, उपनिषद, भगवद्गीता, रामायण, महाभारत आदी धार्मिक ग्रंथ असले तरी त्यामध्ये भारतीय तत्त्वज्ञान आणि जीवनाच्या मूलभूत प्रश्नांचा विचार केलेला दिसून येतो.

इंग्रजांच्या आगमनानंतर भारतीय साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणात

बदल झालेला दिसून येतो. भारतीय समाजामध्ये झालेल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक बदलांची साहित्यिकांना प्रेरणा मिळाली. रवींद्रनाथ टागोर, प्रेमचंद, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय, कुवेंपू, केशवसुत, महात्मा फुले, अली सरदार जाफरी, आर. के. नारायण, अरुंधती रॉय, विक्रम सेठ, अण्णा भाऊ साठे, महादेवी वर्मा, द.रा. बेंद्रे, सलमान रश्दी आदींचा उल्लेख करता येईल.

भारतीय साहित्यामध्ये प्रामुख्याने निसर्ग, माणूस, समाज आणि ईश्वर यांच्यातील संबंधाची-नात्याची व समजून घेण्याची चर्चा केलेली दिसून येते. शिवाय प्रेम, युद्ध, शांती, सुख-दुःख, आध्यात्मिक आदी जीवनाच्या विविध पैलूंचे चित्रण केलेले दिसून येते. भारतीय साहित्यामध्ये लोकसाहित्याची एक समृद्ध परंपरा आहे, ज्यामध्ये मौखिक स्वरूपात पुष्कळ अशी रचना केली गेलेली आहे. लोकगीते, लोककथा, विधी-संस्कार यांचा यामध्ये समावेश आहे. भारतीय साहित्याचे स्वरूप चार प्रवाहांतून संक्रमित झालेले दिसून येते:

1. वैदिक-उपनिषद काळापासून सुरू झालेला आध्यात्मिक प्रवाह: यामध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद याबरोबरच ‘ईशावास्योपनिषद’, ‘कठोपनिषद’, ‘ब्राह्मण-अरण्यक’ यातून आलेली आध्यात्मिक परंपरा होय.
2. बौद्ध आणि जैन ग्रंथांतून प्रवाहित झालेला करुणा, श्रद्धा, विश्वास, त्याग आदी तत्त्वज्ञानाचा प्रवाह.
3. मध्ययुगीन कालखंडात भारतीय संत-महंतांनी प्रतिपादलेली समानता आणि चातुर्वर्ण्यश्रमाला विरोध करणारा प्रवाह.
4. ब्रिटिश, डच, पोर्तुगीज यांच्या भारतातील आगमनानंतर आलेला वैज्ञानिक दृष्टिकोन, औद्योगिक व्यापार, समाज सुधारणा आणि नवजागृतीचा प्रवाह.

भारतीय साहित्यातील प्रारंभिकतेच्या काळात देव-असुर, सत्य आणि असत्य यासंबंधीचे युद्ध आणि मानवी समाजाच्या विकासासाठी दैवी कृपा यासंबंधीची रचना आढळते. असे म्हटले जाते की, भारतीय साहित्याच्या प्रारंभीच्या काळी रहस्यवादी, ईश्वरवादी, भाववादी, प्रत्ययवादी विचारांचा प्रचार-प्रसार केलेला दिसून येतो. यांचा प्रभाव मिथक आणि विविध प्रतीकांच्या माध्यमातून वर्तमान काळातही चालू आहे. दिनकरकृत ‘रश्मीरथ’ अथवा ‘परशुराम की प्रतीक्षा’ अथवा वि. स. खांडेकर लिखित ‘ययाती’ अथवा शिवाजी सावंत लिखित ‘मृत्युंजय’

आदी कादंबऱ्या असोत, अथवा विश्वनाथ सत्यनारायण लिखित 'रामायण कल्पवृक्षक' असो, अथवा के. एल. मुंशी लिखित 'पंचपांडव' असो, या कलाकृतींमधून वरील विचारधाराच चित्रित झालेली आहे. भारतीय साहित्याचे स्वरूप वर्णन करताना, हे स्पष्ट केले आहे की, प्राचीन काळापासून, सर्व भारतीय भाषांमधील साहित्यात अनेक समान प्रवृत्ती दिसून येतात. आधुनिक युगापूर्वी, राम आणि कृष्णाच्या कथांचा सर्व भारतीय साहित्यावर समान प्रभाव होता. त्याचप्रमाणे, मध्ययुगीन साहित्यावर भक्ती कवितेचा प्रभाव सार्वत्रिक आहे.

मध्ययुगीन काळातील झालेल्या जागृतीच्या काळात पुनर्जागरण काळाचे साहित्य म्हणून ओळखले जाते. जात, धर्म, विषमता, वर्ग, वर्णाची विषमता व त्याला विरोध करणारे साहित्य निर्माण झाले. सहाव्या आणि सातव्या शतकात तमिळ आळवारांनी आणि कर्नाटकमध्ये शिवशरणांनी बाराव्या शतकात, आणि महाराष्ट्रामध्ये संतांनी आणि गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश आणि काश्मिरी साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण केले. पुढे शंकराचार्य, निंबकाचार्य, माधवाचार्य, रामानुजाचार्य आदींनी भक्ती, अध्यात्म आणि भागवत धर्माला एक नवा आयाम दिला. भारतीय विविध भाषांतून रचले गेलेल्या साहित्यामध्ये द्वैत-अद्वैतवाद, सुफीवाद, निर्गुण-सगुण यातील सत्य-असत्याची चर्चा केलेली दिसून येते. पुढे १९ व्या शतकामध्ये परिवर्तनशील आणि विचारवादी काळाला सुरुवात झाली. औद्योगिक विकास, समुद्री दळणवळण, रेल्वे-ट्राम, टेलीग्राफ, युद्धसामग्री आदी विज्ञान विकासाबरोबर मार्क्सवाद, अस्तित्ववाद, मनोविश्लेषणवादाची एक वैचारिक क्रांती घडून आली. स्त्री-शिक्षण, देशभक्ती, अस्पृश्यता निवारण, समाज सुधारणा, भूतकालीन साहित्याचे पुनरावलोकन आदी देश जागृतीचे एक नवे मॉडेल विकसित झाले. विसाव्या शतकात भारतीय अस्मिता, शैक्षणिक सुधारणा आणि आत्मगौरवाचा प्रश्न निर्माण झाला. या व अशा विषयांची मांडणी करणारी पहिली कादंबरी विविध भारतीय भाषांमध्ये लिहिली गेली. हिंदीमध्ये लाला श्रीनिवासदास, तमिळमध्ये सॅम्युअल वेदनायकम पिल्लाई, मल्याळममध्ये इंदू मेनन, तेलुगूमध्ये कृष्णमा चेट्टी, मराठीमध्ये हरिभाऊ आपटे, कन्नडमध्ये गुळवाडी वेंकटराय, बंगालीमध्ये (पारीचाँद मित्र?), उर्दूमध्ये मिर्जा रुसवा इत्यादी कादंबरीकारांनी वर्ण-वर्ग विषमता, जातीयता आणि समाज सुधारणा आदींचे चित्रण आपल्या कादंबरी साहित्यातून केलेले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय भाषा-साहित्यामध्ये दोन प्रमुख

प्रवृत्तीचे साहित्य प्रकाशित झालेले दिसून येते. एकीकडे भारतीय साहित्याच्या धरतीवर भरभराट होत असलेले पौराणिक साहित्य - ज्यामध्ये हिंदीतील 'अंधायुग' (धर्मवीर भारती), 'उर्वशी' (दिनकर), 'संशय की एक रात' (नरेश मेहता), 'राम की शक्ति पूजा' (निराला), 'विश्वबाहू' (परशुराम जोध?), 'मत जा सरहप्पा' (विश्वनाथ उपाध्याय), मराठीतील 'ययाती' (वि. स. खांडेकर), 'मृत्युंजय' (शिवाजी सावंत), कन्नडमधील 'पर्व' (एस. एल. भैरप्पा), गुजरातीमधील 'पंचपांडव' 'सत्यभामा', (के. एल. मुन्शी), ओडियामधील 'द्रौपदी' (प्रतिभा रॉय). तर दुसरीकडे भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारामुळे जागृत झालेला येथील शोषित, वंचित, बहिष्कृत वर्ग आणि पुरोगामी विचाराने निर्माण झालेले साहित्य होय. यामध्ये विविध भारतीय भाषेत नव समस्यांवर निर्माण झालेले साहित्य प्रवाह, मराठीतील ग्रामीण, दलित, मुस्लिम, आदिवासी, स्त्रीवादी, कामगार साहित्य प्रवाहाचे लेखन, तर हिंदीमधील राष्ट्रवाद, देशभक्ती, सामाजिक जागृती, गरिबी, साम्राज्यशाही, भांडवलशाही, पंचवार्षिक योजना पुरस्कृत आर्थिक विकास, औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण, कुशलता व अकुशलता, शिक्षित-अशिक्षित, बेकारी, भ्रष्टाचार, कामगार, भूमीहीन शेतकरी, दलित, स्त्रीवर्गाचे केले जाणारे शोषण आदींचे चित्रण अज्ञेय, मुक्तिबोध, नेमीचंद्र जैन यांच्या साहित्यातून तर बंगालीमधील जीवनानंद दास, रवींद्रनाथ टागोर यांच्या लेखनातून तर गुजराती मधील आदिल मन्सूर, चिनू मोदी यांच्या लेखनातून आलेले आहे. तर कन्नडमधील कुवेंपू, पाटील पुट्टप्पा, द. रा. बेंद्रे यांच्या साहित्यातून समाजवादी, प्रगतिशील विचारधारा आविष्कारित झालेली आहे.

तेलुगू साहित्यामध्ये वचन कविता आंदोलन, विप्लव कविता आंदोलन, दिगंबर कविता निर्माण झाली तर उमाशंकरराव, शिवसागर, चेरबंडराजू, दासरथी आदींनी तेलुगू कवितेमध्ये परिवर्तनवादी विचारधारा आणली. तर मल्याळम कवितेमध्ये समाजवादी विचारधारा सुगत कुमारी, के. सच्चिदानंद आदींनी निर्माण केली. मराठीमध्ये वसंत बापट, नारायण सुर्वे, विं. दा. करंदीकर, तमिळमध्ये प्रगतिशील, समाजवादी विचारांची कविता पी. व्ही. जीवनानंद, के. सी. एम. अरुणाचलम आदी लेखक कवींनी निर्माण केली. भूक, वर्ण, वर्ग, विषमता, लिंगभेद, दारिद्र्य आदींचे सशक्त चित्रण यावरील साहित्यातून आलेले आहे. एकाकीपणा, हतबलता, निराशा, अपराधीची भावना, मानवी अस्तित्व, मृत्यू आदींचे चित्रण भारतीय कवितेमध्ये साठोत्तरी काळात मोठ्या प्रमाणात आलेले आहे. 'हंगरी जनरेशन' (बंगाली), 'दिगंबर कवुलु'

(तेलुगू), 'कानुरू सुब्बाम हेगडती' (कुवेंपू-कन्नड), 'बडतनद हसिविन हाडु' (के. वेंकटराम) आदींचा उल्लेख करता येईल. अस्तित्ववादी विचार मराठीमधील बा. सी. मर्ढेकर, मल्याळम भाषेतील मुकुंद, कन्नडमधील पी. लंकेश आदींच्या साहित्यातून चित्रित झाला आहे.

कोणतेतरी एक भारतीय भाषेतील साहित्य इतर भाषेवर प्रभाव टाकते आणि यातून एक सांस्कृतिक अभिसरण घडून येते. विसाव्या शतकात भारतीय साहित्यामध्ये ऐतिहासिक आणि राजनैतिक घटनाक्रमांची चर्चा करण्यात आली आहे. बंगालीमधील 'आनंदमठ' ही कादंबरी असो; तेलगूमधील 'वेई पडगुलु' (सहस्त्रफण), ओडिया भाषेतील फकीर मोहन सेनापती यांची कादंबरी असो अथवा गुजराती भाषेतील कन्हैयालाल माणिकलाल मुंशी यांची रचना असो किंवा मराठीतील बाळ गंगाधर टिळक यांचे साहित्य असो, पंजाबीमधील करतार सिंह दुग्गल यांची साहित्यरचना असो, यामधून जागतिक स्तरावरील असलेला वसाहतवाद, सरंजामशाही, भांडवलशाही आणि साम्राज्यशाही प्रवृत्तीचा निषेध करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय साहित्यामध्ये राष्ट्रीय स्वातंत्र्यलढा, गांधी विरुद्ध टिळक, नेहरू विरुद्ध चंद्रशेखर आझाद, जिना विरुद्ध सुभाषचंद्र बोस यांच्यातील मतभेद, संघर्ष याबरोबरच भारत-पाक संघर्ष, भारत-चीन सीमासंघर्ष, भ्रमनिरास, निराशा, बेरोजगारी आणि महागाई आदी विषयांचे चित्रण आलेले आहे. माहिती क्रांतीच्या या युगात, घटना संपूर्ण राष्ट्रावर समान रीतीने परिणाम करू लागल्या आहेत. वाहतुकीची साधने आणि महानगरांमध्ये उपजीविकेचा शोध यामुळे देखील प्रादेशिक अडथळे दूर झाले आहेत. परिणामी, आजचे भारतीय साहित्य संपूर्ण भारतीय राष्ट्राचे प्रतिबिंबित करते. जर उदयशंकर भट्ट मुंबईतील मच्छिमारांबद्दल लिहू शकतात, तर रांगेय राघवही षंडांच्या चरित्रांबद्दल तितक्याच अधिकाराने लिहू शकतात. विमल मित्रा आणि महाश्वेता देवी यांच्या कथा संपूर्ण भारतीय मानसिकतेवर परिणाम करतात. म्हणूनच, आजचे साहित्य, ते कोणत्याही भाषेत लिहिले गेले असले तरी, संपूर्ण देशावर त्याचा प्रभाव पडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य इतर भारतीय भाषेबरोबर जागतिक पातळीवरतीही गेलेले दिसून येते. या साहित्याची मोठ्या प्रमाणात चर्चा आणि त्यावर संशोधनही झालेले आहे.

भारतीय कथा-कादंबरी साहित्य अत्यंत समृद्ध असे आहे. कथा आणि कादंबरी साहित्य सतत विविध विषयाने विकसित झालेले दिसून

येते. राजा-राणी, धिरोदात्त नायकाच्या कथानकाबरोबर युगनायक, कामगार, शेतकरी, दलित, उपेक्षित वर्गाचे कथानक आलेले आहे. हिंदीमध्ये प्रेमचंद, ओडियामध्ये सेनापती फकीर मोहन यांनी ‘छ माण आठ गुंठ’ चे कादंबरीलेखन करून समाजातील अंधश्रद्धेवर प्रकाश टाकला आहे. बंगालीमध्ये शरदचंद्र चट्टोपाध्याय यांनी मध्यमवर्गीय स्त्री वर्गाची व्यथा कथा कादंबरीतून मांडली. मराठीमध्ये भालचंद्र नेमाडे, आनंद यादव, अण्णा भाऊ साठे यांनी एकाकीपण, शेतकऱ्यांचे प्रश्न, उपेक्षित वर्गाचे चित्रण आपल्या कथा-कादंबरीतून केले. भारतीय कथात्मक साहित्याने आपल्या समकालीन परिस्थितीवर भाष्य केलेले आहे. हे कथासाहित्य राजकारणातील भ्रष्टाचार, स्वतंत्र भारताची शासननीती, बेरोजगारी, खाजगीकरण, जागतिकीकरण, दहशतवाद, भ्रामक शिक्षणनीती आदी महत्त्वाच्या प्रश्नांवर व विषयांवर सर्व भारतीय भाषांतून निर्माण झालेले आहे. दलित साहित्याची निर्मिती प्रथम १९६०-६५ नंतर सशक्त प्रमाणात मराठीत झाली. तदनंतर हिंदी, कन्नड, तेलुगू, तमिळ या भारतीय भाषांमध्ये १९८०-८५ नंतर झालेली दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळातील पिढी जसजशी मोठी होत गेली तसतसे लोकशाही आणि तिच्या नेतृत्वाबद्दल त्यांचा भ्रमनिरास होत गेला. पारंपारिक समस्या कायम राहिल्या, परंतु तरुण पिढीलाही नवीन समस्यांशी झुंजावे लागले. याचा भारतीय मानसिकतेवर गंभीर परिणाम झाला. निरक्षरता, बेरोजगारी आणि गरिबीसारख्या आर्थिक समस्या, हुंडा, महिलांचे शोषण आणि दलितांचे शोषण यासारख्या सामाजिक समस्या आणि भ्रष्टाचार, लूटमार, अराजकता, नेतृत्वाचे दुहेरी निकष, दहशतवाद, दरोडा आणि खून यासारख्या समस्या भारतीय समाजात सुटल्या नाहीत. त्यामुळे देशाची तरुण पिढी हतबल झाली. शिक्षण आणि नैतिक मूल्ये महत्त्वाची राहिली नाहीत. परिणामी, संपूर्ण भारतीय साहित्याला या समस्यांपासून मुक्त राहणे अशक्य झाले. आजच्या भारताचे हे चित्र कोणत्याही प्रदेश, राज्य किंवा भाषेपुरते मर्यादित नाही; ते संपूर्ण भारतीय साहित्यात आढळते. म्हणूनच, आजच्या भारतीय साहित्यात अनेक प्रवाह (ट्रेंड) अबाधित आहेत.

अशा भारतीय साहित्याला मराठी भाषा साहित्याने मोठे योगदान दिलेले आहे. मध्ययुगीन काळात निर्माण झालेली संत ज्ञानेश्वरांची ‘ज्ञानेश्वरी’ असो, संत नामदेवांचे अभंग असोत किंवा संत तुकाराम महाराजांची अभंगरचना असो किंवा संत रामदासांचे

मनाचे श्लोक असोत, महात्मा फुले यांचे साहित्य, आगरकर, टिळक, हरिभाऊ आपटे, वि. स. खांडेकर, विष्णू वामन शिरवाडकर, प्र. के. अत्रे, नामदेव ढसाळ आदींचे साहित्य विपुल प्रमाणात इतर भारतीय भाषांमध्ये भाषांतराच्या माध्यमातून गेले आहे. केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीमध्येही पद्यरचना करून संत नामदेवांनी राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व ओळखले. मराठी साहित्यिकांचे योगदान भारतीय साहित्याला मोठ्या प्रमाणात दिले गेलेले आहे. मराठी भाषा आणि साहित्याने भारतीय साहित्यामध्ये आपले एक वेगळे असे स्थान निर्माण केलेले आहे. भारतीय साहित्याला हे अमूल्य योगदान मिळवून देण्यामध्ये मराठीतील अनेक साहित्यिकांनी कसदार असे लेखन करून मराठी साहित्य समृद्ध केले आहेच, शिवाय भाषांतराच्या रूपाने ते इतर भारतीय भाषांमध्ये देखील गेलेले आहे. त्यामध्ये अनेक मराठी साहित्यिकांचा समावेश आहे. ज्यांनी मराठी साहित्य समृद्ध केले ते मातृहृदयी व्यक्तिमत्व साने गुरुजी यांनी 'श्यामची आई' लिहून आंतरभारती संकल्पना मांडली. 'श्यामची आई' ने मराठीबरोबर अनेक भाषेतील वाचकाला रडवले, रंजविले, प्रबोधन केले. महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे यांनी 'बटाट्याची चाळ', 'गोळा बेरीज', 'असा मी असामी', 'व्यक्ती आणि वल्ली', 'हसवणूक' आदी ग्रंथांचे लेखन करून मराठीबरोबर भारतीय साहित्याला योगदान दिले. त्याबरोबरच भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी, शिरवाडकर यांचे 'नटसम्राट' हे नाटक, लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या', लक्ष्मण माने यांचे 'उपरा', दया पवार यांचे 'बलुत', शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी', दादासाहेब मोरे यांचे 'गबाळ' आदी आत्मकथने आणि विश्वास पाटील यांची 'महानायक' ही कादंबरी मराठीबरोबर इतर अनेक भारतीय भाषांमध्ये भाषांतराच्या रूपाने गेलेली दिसून येते. पु. ल. देशपांडे, शिरवाडकर आणि वि. स. खांडेकर आणि इतर अनेक दलित साहित्यिक हे इतर भाषांमध्ये अत्यंत लोकप्रिय साहित्यिक म्हणून चर्चिले जातात. गळगनाथ यांनी हरिनारायण आपटे यांच्या अनेक कादंबऱ्या कन्नडमध्ये अनुवादित केल्या आणि उत्तर कर्नाटकात कादंबरीचा वाचक वर्ग निर्माण केला. त्यामुळे स्वतंत्र कन्नड कादंबऱ्यांची लोकप्रियता वाढली. शिवराम कारंथ आणि एस. एल. भैरप्पा यांच्या अनेक कादंबऱ्या मराठीत अनुवादित झाल्या आहेत आणि ते मराठीत खूप लोकप्रिय साहित्यिक आहेत.

भारतीय साहित्य अकादमीने मराठीतील ५० ते ६० विविध साहित्य प्रकारातील कलाकृतींना पुरस्कार देऊन भारतीय पातळीवर त्यांचा गौरव केलेला आहे. अशा साहित्य अकादमी प्राप्त कलाकृती

अनेक भारतीय भाषांमध्ये अनुवादित-भाषांतरित होऊन भारतीय साहित्याच्या कक्षेत आपले स्थान निर्माण केले आहे. 'वैदिक संस्कृतीचा इतिहास' या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या संशोधन ग्रंथापासून ते सुधीर रसाळ यांच्या 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षाग्रंथापर्यंत साहित्य अकादमीने पुरस्कार देऊन गौरव केला आहे. या पुरस्कारामध्ये कथा, कादंबरी, काव्य, चरित्र, आत्मचरित्र, समीक्षा, नाटक, ललितनिबंध, व्यक्तिचित्रण, संशोधन, आत्मकथन, लघुकथा इ. साहित्य प्रकारातील साहित्यकृतींना पुरस्कार मिळालेला आहे. यातील अनेक कलाकृती हिंदी, इंग्रजीबरोबर इतर भारतीय भाषांमध्ये भाषांतरित-अनुवादित झालेल्या आहेत. त्यामुळे भारतीय साहित्याला मराठीने भरीव व समृद्ध असे योगदान दिलेले आहे.

## समारोप

भारत हा एक बहुभाषिक देश आहे. भारतात प्राचीन काळापासून असंख्य वांशिक गट अस्तित्वात असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे असंख्य भाषा आहेत. या वांशिक गटांमुळे असंख्य भाषा आहेत आणि या भाषांमुळे असंख्य भाषांमध्ये साहित्य आहे. भारतीय साहित्यात भाषिक फरक असूनही, अंतर्निहित स्वर प्रत्येक युगात सारखाच राहिला आहे. भारतीय साहित्याची एकता असूनही, त्याची प्रादेशिक ओळख अबाधित आहे. भारतीय भाषांचे प्रादेशिक स्वरूप असूनही, मध्य भारतातील प्राचीन काळातील संस्कृत साहित्य संपूर्ण भारतात लिहिले गेले आहे. अनेक भाषांमध्ये त्यांची साहित्यिक समृद्ध परंपरा निर्माण झालेली आहे. अशा प्रकारे, राष्ट्रीय आणि प्रादेशिक भाषांमध्ये नेहमीच समन्वय राहिला आहे. भारतीय साहित्याचा एक महत्त्वाचा गुणविशेष म्हणजे हे साहित्य सतत परिवर्तनशील राहिले आहे. काळानुसार त्यामध्ये बदल होत गेलेला आहे. भारतीय साहित्य हे 'विविधतेमध्ये एकता आणि एकतेमध्ये विविधता' अशा स्वरूपाचे आहे. विविधता असूनही भारतीय साहित्यात एकता आहे ती भारतीय संस्कृतीमुळेच आहे.

## संदर्भ साहित्य


1. १. मराठी भाषेचे मूळ: विश्वनाथ खैरे, प्रकाशक-उमादेवी खैरे, संमत प्रकाशन, ३७४ सिंध सोसायटी, औंध, पुणे.
2. २. भाषा साहित्य और संस्कृति: संपा. विमलेश कान्ति वर्मा, मालती, प्रकाशक, ओरियंट ब्लॅकस्वॉन प्रायव्हेट लिमिटेड, आसफ अली रोड, नई दिल्ली.
3. ३. मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती: वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
4. ४. कर्नाटक महाराष्ट्र सांस्कृतिक अध्ययनाची तात्त्विकता (कन्नड): डॉ ए. बी. घाटगे, प्रकाशक-कन्नड जागृती पुस्तक माला, अल्लमाप्रभू जनकल्याण संस्था, चिंचणी.
5. ५. साहित्यसंचित : प्रा. रा. ग. जाधव, परिमळ प्रकाशन, औरंगाबाद.
6. ६. प्राचीन भारत-एक रूपरेखा (हिंदी): डी. एन. झा, पीपल्स पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.
7. ७. प्राचीन भारताचा इतिहास: प्रा. मा. म. देशमुख, विश्वभारती प्रकाशन धनवटे चेम्बर्स, सीताबर्डी, नागपूर-१२.
8. ८. भारतीय साहित्य (हिंदी) : डॉ. लक्ष्मीकान्त पाण्डेय, डॉ. प्रमिला अवस्थी, आशीष प्रकाशन, कानपुर.
9. ९. नवभारत (मासिक) ऑक्टो. २000, द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.


**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.